या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार २७ मे २०२४ | अंक१६८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी
नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

# भाजप पक्षामध्ये जावं असं काही सहकाऱ्यांचं म्हणणं; शरद पवारांचा सर्वात मोठा खुलासा



अजित पवार हे भाजपसोबत गेले. त्यानंतर शरद पवार यांच्या भूमिकेबद्दल अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं गेलं. या शिवाय राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नेत्यांनी तर याआधीही शरद पवारांनी भाजपसोबत बोलणी केली होती, असा दावा केला. शरद पवार भाजपसोबत जाण्यासाठी चर्चा करत होते. मात्र ऐनवेळी त्यांनी आपला निर्णय बदलला, असं विधान तर खुद्द अजित पवारांनी देखील केलं आहे. त्यामुळे खरंच भाजप सोबत जाण्यासाठी शरद पवार सकारात्म होते का? त्यांची भूमिका नेमकी काय होती? या सगळ्यावर शरद पवारांनी भाष्य केलं आहे. एका मुलाखती दरम्यान शरद पवारांनी राष्ट्रवादीच्या नेत्यांचं म्हणणं काय होतं? आणि त्यांची भूमिका काय आहे? यावर भाष्य केलंय“भाजपमध्ये जावं, असं सहकारी म्हणाले”2004, 2014, 2017, 2019 यावेळी शरद पवारांनी भाजपसोबत सत्तेत सहभागी होण्यासाठी चर्चा केली, असा दावा राष्ट्रवादीचे नेते करतात. त्यावर शरद पवारांनी उत्तर दिलं. आमच्या पक्षातील अनेक सहकाऱ्यांचं हे मत होतं की आपण भाजपसोबत जावं. दोन पद्धतीने त्यांच्यासोबत जाण्याबद्दल बोलत होते. एक त्यांच्याबरोबर सत्तेत जावं आणि दुसरं म्हणजे भाजप पक्षात जावं असं काही सहकाऱ्यांचं म्हणणं होतं, असं शरद पवारांनी सांगितलं.पवार काय म्हणाले?

जे आमदार निवडून आले त्यातील बऱ्याच आमदारांचं म्हणणं होतं की आपण भाजपसोबत जावं. त्यामुळे मी म्हटलं की तुम्हाला चर्चा करायची असेल तर करा. काय प्रस्ताव असेल तो सांगा. पण त्यांचा प्रस्ताव आला तो पटणारा नव्हता. पण मी म्हटलं ज्यांना जायचं असेल त्यांना स्वातंत्र्य आहे. पण मी येणार नाही. नंतर आता एका ठराविक वेळेनंतर काही लोकांनी तो निर्णय घेतला, असं शरद पवार म्हणाले.

2004 मध्ये प्रफुल्ल पटेल यांचा आग्रह होता की, आपण भाजपसोबत जावं. त्यावेळी इंडिया शायनिंगची घोषणा झाली होती. अटलबिहारी वाजपेयींसारखा नेता दुसरं कुणाला स्विकारणार नाही. आपण त्यांच्याबरोबर जावं. त्यांच्या आघाडीत आपण सहभागी व्हावं. पण मी ते स्विकार नाही केलं, असं शरद पवार म्हणाले.


## गाव गल्ली डोंगर दऱ्यात वाडी वस्तीवर

### धुमधडाक्यात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करा, अमर वाघमोडे अंकुश गवळी यांचे आव्हान

**बीड प्रतिनिधी**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती 31.मे रोजी संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणात उत्साहात साजरी करण्यात शासनाच्या वतीने अनेक जयंतीच्या शासकीय सुट्ट्या दिल्या गेल्या आहेत,





या सुट्टीच्या औचित्य साधून समाजातील अनेक घटकांनी जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो महापुरुषांच्या त्यांनी केलेल्या त्यागाचा व त्यांच्या विचारांच्या आत्मसमान करतात दिनांक 31 मे रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात शासकीय सुट्टी जाहीर करण्यात यावी देशभरातील सर्व शासकीय कार्यालयात गाव वाडी वस्तीवर राजमाता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करून त्यांच्या विचाराचा वसा सर्वसामान्य माणसापर्यंत गेला पाहिजे असे आव्हान युवा नेते अमर वाघमोडे युवा पत्रकार अंकुश गवळी यांनी केले आहे,

## उमरा सर्कलमधील असंख्य कार्यकर्त्यांचा उबाठा गटामध्ये पक्षप्रवेश

**नांदेड प्रतिनिधी**

नांदेड : शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री मा.उद्धवजी ठाकरे यांच्या कार्य-कर्तृत्वावर विश्वास ठेवून लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील उमरा सर्कल मधील असंख्य कार्यकर्त्यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे महाराष्ट्र राज्य संघटक मा.एकनाथ दादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रवेश केला. यामध्ये बालाजी कपाळे,ग्रा.पं. सदस्य तिरुपती हंबर्डे (वाका) शुभम पाटील नांदगावकर, विलास पाटील कपाळे (गोळेगाव) प्रसाद गंगातिरे (धनज) श्याम हंबर्डे



(वाका) सुरेश बोईवारे (लाडका) प्रकाश भागानगरे (नंदनवन) दिगंबर भागानगरे, स्वप्नील शिंदे (दहीकळंबा) परमेश्वर सूर्यवंशी (दाताळा) माधव जाधव (पिपळदरी) यांच्यासह आदी शिवसैनिकांनी (उबाठा) गटात पक्ष प्रवेश केला.पक्षप्रवेश केलेल्या सर्व शिवसैनिकांचे मा.एकनाथ पवार यांनी शिवसेनेचे भगवे वस्त्र रुमाल देऊन त्यांचा सत्कार केला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपजिल्हा प्रमुख संजय पाटील ढेपे, तालुका प्रमुख संजय पाटील ढाले, उपजिल्हा प्रमुख युवासेना दिगंबर पाटील इंगोले, युवासेना जिल्हा संघटक योगेश पाटील नंदनवनकर उपतालुका प्रमुख संतोष पाटील वडवळे,सरपंच परमेश्वर कपाळे,मालोजी वाघमारे, संदीप भाऊ मंगनाळे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## संत आश्रुबा ( दादा ) गायकवाड यांच्या राख सावडण्याच्या निमित्ताने वृक्षारोपन.

**प्रतिनिधि/केज**

आज दिनांक २६/५/२०२४ रोजी संत आश्रुबा ( दादा ) गायकवाड हे दिनांक २४/५/२०२४ रोजी अनंतात विलीन झाले, पायाच भाग म्हणून राख हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीत राख सावडण्यात आली. या निमित्ताने आंब्याच्या झाडाचे वृक्षारोपन करण्यात आले. संत आश्रुबा ( दादा) गायकवाड यांची धर्म पत्नी ग.भा. भागीरथी ( आक्का) गायकवाड, बंधू बन्सी ( नाना ). गायकवाड, रामकृष्ण ( तात्या ) गायकवाड, नवनाथ (बापु) गायकवाड, वसुदेव( बप्पा ) गायकवाड, ज्ञानोबा( काका) गायकवाड, मारुती ( आण्णा ) गायकवाड,



मंगल( कबई) शिंदे, जान्हवी ( काकू) पतंगे, सविता ताई लगड, शकुंतला क्षीरसागर,सिंधुबाई गायकवाड, रुक्मिन बाई गायकवाड, वैशालीबाई गायकवाड, लक्ष्मण गायकवाड, दत्ता गायकवाड, शामल गायकवाड, सुमन बाई गायकवाड, मणिषा गायकवाड, दुर्गा गायकवाड, शितल नायकोडे, ओम गायकवाड, यांच्यासह मोठया संखेने उपस्थिती होती. यावेळी केशर आंब्याची लागवड करण्यात आली. दुर्गा गायकवाड, शितल नापकोडे यांनी वृथारोपन व पर्यावरण या विषयी मार्गदर्शन व वृक्ष संवर्धन करण्याचे अवाहन केले.



अशोक हिंगे पाटील यांच्या मातोश्री कै.सौ.शशिकला सुखदेव हिंगे यांचे नुकतेच निधन झाले .अशोक हिंगे पाटील यांच्या बीड येथील राहत्या घरी जाऊन संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी कुटुंबियांची सांत्वन पर भेट घेतली .

## लालपरीच्या पायरीचे शेवटचे दर्शन घेऊन वाहकाची सेवानिवृत्ती

**प्रतिनिधि/शिरूर कासार**

प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीदवाक्य घेवुन सर्वसामान्य जनतेचा प्रवास सुखकर करणाऱ्या पाटोदा आगाराच्या पाटोदा-पाथर्डी बसवर कर्तव्यावर असलेल्या सखाराम सरवदे यांची सेवानिवृत्ती झाली आहे.पाथर्डीला मुक्कामी बस घेवुन जाणाऱ्या सरवदे यांनी शिरूर कासारशहरातील बस स्थानकात लालपरीच्या पायरीचे शेवटचे दर्शन घेऊन आपली सेवापूर्ती सन्मानाने पूर्ण केली आहे.तालुक्यातील पाडळी येथील रहिवासी असलेल्या सखाराम सरवदे यांनी बत्तीस वर्ष विनातक्रार पाटोदा आगारात वाहक म्हणून सेवाकाल पूर्ण केला आहे.31 मे रोजी त्यांची नियमानुसार सेवा पूर्ण होत असून त्यांचा सेवापुर्ती सोहळा आगारात होणार आहे.तत्पूर्वी कर्तव्यावर असल्यामुळे शहरातील बस स्थानकात त्यांचा सत्कार करण्यात आला.या वेळी फेटा बांधून गळ्यात हार घालून सरवदे यांना छोटेखानी स्वरुपात निरोप देण्यात आला.सखाराम सरवदे यांना दोन मुलं आणि एक मुलगी आहे.त्यांचा एक मुलगा




दुबई मध्ये अभियंता म्हणून कार्यरत आहे. सरवदे यांनी आपल्या सेवेच्या कार्यकाळात प्रवासात असणाऱ्या एकाही प्रवाशाला प्रवासापासून वंचित ठेवले नाही.शिरूर बस स्थानकात आयोजित त्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी वाहक राजेंद्र केदार,नवनाथ पानखडे,अशोक कातखडे,प्रमोद अंदुरे यांच्यासह सर्पमित्र महेश औसरमल,प्रताप कातखडे,प्रकाश भांडेकर,नितीन गाडेकर यांची उपस्थिती होती.

## कविता

# आजोळ

मला वाटत विमान होऊन
भुर्रकन आजोळी जावे
आजीच्या गळ्यास बिलगुन
तिचा लाडोबा व्हावे

आजोबांच्या मिशी वरून
अलगद हात फिरवावा
त्यांच्या कोटाच्या खिशातील
सुकामेवा हळूच घ्यावा

मामा संगे सांज सकाळी
आमराईतून गात फिरावे
रानोमाळी फिरता फिरता
पाखरांशी हितगुज साधावे

करवंदीच्या जाळीमधून
काळीभोर करवंद खुडावी
जांभूळ बोरे आणिक चींचा
तळ्याकाठी बसुनी खावी

सायंकाळची शुभम करोती
आजी संगे बोलावी
आजोबांच्या चष्म्याशी
हळूच लुडबुड करावी

चुलीपाशी मामी संगे
हळूच गोष्टी कराव्या
तिच्या हातच्या पुरणपोळ्या
चवी चवीने खाव्या

आजीच्या गोष्टी ऐकत
निज डोळ्यावर यावी
स्वप्नांच्या दुनिये मधली
परी मजला भेटावी

सौ. वंदना शशिकांत पाटील

# सातारा परिसर पोलीस चौकीत दोन आरोपींवर रात्री उशिरा ॲट्रॉसिटी गुन्हा दाखल

## मातंग एकता आंदोलनाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार संदिप मानकर यांच्या पुढाकाराने पिडीत खंदारे परिवाराला न्याय मिळणार

**सुनिल झिंजूर्डे पाटील**

मातंग समाजातील रिक्षाचालक विलास खंदारे हे रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवितात. नेहमीप्रमाणे सातारा परिसरातील रेणुका माता मंदिर कमानीजवळ आपली रिक्षा लावत असतांना दुसरा रिक्षाचालक नामे कय्युम पटेल याने रिक्षा लावण्यावरुन त्यांच्याशी वाद घातला व वाद एकोप्याला गेल्यानंतर जातीवाचक व आई-बहिणीवरील शिवीने त्याचे पोट भरले नसल्याने त्याने रिक्षातील हत्यार काढून खंदारे यांच्या डोक्यात मारले व लाथा-बुक्क्यांनी त्यांच्या छातीत व पाठीवर मुक्का मार दिला सोबतच लोखंडी टामी काढून सुद्धा बेदमपणे मारहाण केली. समोरुन किमान 70 ते 80 लोकांचा समूह आला आणि इकडे हा एकटा असलेला विलास खंदारे... तेवढ्यात त्याचा छोटा भाऊ सोनू खंदारे त्याठिकाणी आला व त्याने तात्काळ आपल्या भावाला रिक्षात बसवीत सातारा पोलीस स्टेशन गाठले. पोलिसांनी त्यांना अगदी हलक्यात घेतले व पुढील तपासणीसाठी घाटी रुग्णालयात पाठविले इतक्यात समोरील पटेल परिवाराला वाटले की हे आपल्यावर तक्रार दाखल करतील म्हणून आधीच त्यांनी खंदारे यांच्यावर 324 कलमाखाली गुन्हा दाखल केला. त्यानंतर घाटी प्रशासनाने खंदारे यांची वैद्यकीय तपासणी सुरु केली असता त्यांच्या डोक्यांत मारलेल्या हत्याराच्या ठिकाणी 6 ते 7 टाके पडले व त्यांच्या छातीचा सिटीस्कॅन काढण्यात आला व हाताचा एक्सरे सुद्धा काढण्यात आला. त्यानंतर पुन्हा ते सातारा पोलीस ठाण्यात आपली तक्रार दाखल करण्यासाठी आले असता पोलिसांनी त्यांना टाळाटाळ करीत तुमच्यावर आधीच समोरच्या पार्टीने 324 गुन्हा दाखल केला आहे अशी बोळवण करीत आता तुमची तक्रार घेतली जाणार नाही असे सांगितले. मात्र यानंतर पीडित परिवाराने पत्रकार तथा मातंग एकता आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष संदिप मानकर यांच्याशी संपर्क करुन घडलेली घटना सविस्तरपणे सांगितली यांवर मानकर यांनी स्वतः आपल्यासहित मनोहर घुले व राहूल अंभोरे आदी कार्यकर्त्यांसमवेत सातारा पोलीस ठाणे गाठून पीडित कुटुंबियांची भेट घेऊन घडलेला प्रकार माहीत केला व पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ब्रम्हा गिरी यांची भेट घेऊन त्यांना सर्व प्रकार कथन करुन अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंदवावा अशी मागणी केली. त्यांवर त्यांनी यांसाठी मी वरिष्ठांचे मार्गदर्शन घेतो असे सांगत सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) रंजीत पाटील यांना पोलीस ठाण्यात बोलावून मानकर व पीडित परिवाराचे म्हणणे सविस्तरपणे ऐकून घेत व प्रकरणाची शहानिशा करीत शेवटी रात्री उशिरा 11:40 वाजता फिर्यादी विलास खंदारे यांच्यावर हल्ला करणारे व त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या देणारे आरोपी कय्युम पटेल व सहआरोपी अशपाक पटेल यांच्यावर अनुसूचित जाती-जमाती कायदा (ॲट्रॉसिटी) अंतर्गत कलम 324,, कलम 506,, कलम 34,, कलम 3 (1) (R),, कलम 3 (1) (S) आदी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरील प्रकरणाचा पुढील तपास ACP रंजीत पाटील व पोलीस निरीक्षक ब्रम्हा गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा पोलीस ठाणे करीत आहे.

# शिवरस्ता जेसीबीने खोदून अडवला; तहसिल प्रशासन डोके फुटण्याची वाटबघतंय का?? पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील प्रकार :- डॉ.गणेश ढवळे

पाटोदा:- दि.२६. पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही शिवारातील गट क्रमांक २५४ मधिल वैद्यकिन्ही ते वैजाळा रस्त्यावरुन वैद्यकिन्ही वैजाळा शिवावरुन पश्चिमेकडे जाणारा रस्ता हरिदास सोपान खुळे आणि विक्रम किसन काळे यांनी जेसीबीच्या सहाय्याने खोदकाम करुन अडवला असुन तक्रारदार पिराजी उत्तमराव शिंदे यांच्या लेखी तक्रारीनंतर वर्षभरापूर्वी पाटोदा मामलेदार न्यायालयात तहसीलदार रुपाली चौगुले यांनी प्रतिवादी यांना वारंवार नोटीस बजावुनही न्यायालयासमोर हजर झाले नसल्याने मामलेदार अधिनियम १९०६ चे कलम ५ नुसार प्राप्त आधिकारांचा वापर करत अर्जदार पिराजी शिंदे यांचा अर्ज अंशतः मान्य करत वैद्यकिन्ही -वैजाळा दोन गावच्या शिवबांधालगतची जमिन उप अधिक्षक भुमी अभिलेख पाटोदा यांच्याकडुन मोजणी करून घेऊन हद्दी खुना निश्चित करून मंडळ अधिकारी दासखेड यांना उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय पाटोदा यांच्या कडुन निश्चित करण्यात आलेल्या हद्दी व खुना नुसार सदरील रस्ता तात्काळ खुला करण्याचे आदेश दि.१७ मे २०२३ रोजी वर्षभरापुर्वीच दिलेले होते मात्र त्याची वर्ष उलटूनही अंमलबजावणी न झाल्याने अखेर प्रकरण हाताघाईवर आले असुन तहसिल प्रशासन नेमकं शेतकऱ्यांच्या डोके फुटाफुटीची वाट पहात आहे की काय असा प्रश्न पडला आहे. आज दि.२६ रविवार रोजी संबंधित प्रकरणी पाटोदा तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांना फोनवरून याची कल्पना दिली असता उद्या मंडळ अधिकारी यांना पाठवुन प्रकरणात लक्ष देतो असे आश्वासन दिले.



६ एक्कर ऊस रस्त्याच्या वादामुळे जागेवरच वाळला:- तक्रारदार पिराजी शिंदे आमच्या बापजाद्यापासुन हा शिवरस्ता अस्तित्वात असुन बेडुकवाडी आणि वैद्यकिन्ही येथील शेतकऱ्यांचा रहदारीचा रस्ता आहे. माझ्या रानात ६ एक्कर ऊस असुन दरवर्षी कारखाना किंवा गु-हाळाला पाठवत असतो परंतु यावर्षी वर्षभरापासून रस्त्याच्या वादामुळे जागेवरच वाळुन गेला असुन ४ लाखाचे वैयक्तिक नुकसान झाले आहे.जिल्हाधिकारी , तहसीलदार यांना वारंवार तक्रारी नंतर तत्कालीन तहसीलदार रुपाली चौगुले यांनी गेल्या वर्षी आदेश देऊनही अद्याप रस्ता खुला करून देण्यात आला नाही.

पाटोदा तहसिल आणि भुमि अभिलेख कार्यालयातील आधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे पाणंद रस्त्यांची प्रकरणे प्रलंबित:- डॉ.गणेश ढवळे पाटोदा तालुक्यातील विविध गावांमधील शिवार रस्ते तसेच पाटोदा शहरातील पाटोदा ते चुंभळी फाटा पाणंद रस्त्यांच्या अतिक्रमण प्रश्न असो तहसिल प्रशासन आणि उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी केवळ वेळकाढूपणा पणाची भुमिका घेताना दिसत आहेत.राजकारणी आणि धनदांडगे यांच्या हातातले बाहुले बनुन सर्वसामान्य लोकांना केवळ कार्यालयाचे हेलपाटे मारायला लाऊन कागदोपत्रीच टोलवाटोलवी करताना दिसत असुन जिल्हाधिकारी यांच्या आदेशानंतर सुद्धा कर्तव्य बजावताना कसुर करत आहेत.कर्तव्यात कसुर करणा-या अधिका-यांवर प्रशासकीय कारवाईची आवश्यकता आहे.

डॉ गणेश ढवळे लिंबागणेशकर

# स्त्री रुग्णालयात चाललंय काय...?औषध गोळ्यांचा तुटवडा तर डॉक्टर यांची उशिरा उपस्थिती ?

## नर्सची पत्रकार बांधवाला अरेरावीची भाषा ठराविक मेडिकल वरुन औषध खरेदीचा डॉक्टर व नर्सचा आग्रह.

**नेकनुर प्रतिनिधी-**

बीड तालुक्यातील नेकनूर येथील स्त्री रुग्णालय मध्ये गोळ्या औषधांचा तुटवडा अनेक दिवसांपासून दिसू लागला आहे. गेल्या काही दिवसांपासून रुग्णालयामध्ये रुग्णांची हेळसांड होताना सुद्धा पाहायला मिळत आहे. अनेक औषध तसेच गोळ्या बाहेरून घेण्याचे डॉक्टर सांगत आहेत. पित्त गोळी, खोकल्याचे औषध तसेच अनेक प्रकारच्या गोळ्या डॉक्टर बाहेर घेण्यास सांगतात. औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे. यामुळे गोरगरीब रुग्णांचे हाल होत असून, त्यांना औषधे विकत घ्यावी लागत आहेत. गोरगरीब रुग्णांना आरोग्य सेवा व्यवस्थित मिळाव्यात आणि नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी सरकारने जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरू केली आहेत. गोरगरिबांना कोणत्याही प्रकारे त्रासाला सामोरे जावे लागू नये, त्यांच्यावर व्यवस्थित उपचार व्हावे यासाठी आरोग्य विभागाकडून ४०० पेक्षा अधिक प्रकारच्या गोळ्या-औषधांचा साठा प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरवला जातो. मात्र, बीड तालुक्यातील नेकनुर येथील स्त्री रुग्णालय नेकनूर मध्ये अनेक प्रकारच्या गोळ्या-औषधे उपलब्ध नाहीत. काही दिवसांपासून या रुग्णालयामध्ये सुविधांचा बोजवाराही झाला आहे. एकतर डॉक्टरांची वेळेवर उपस्थित न राहणे त्यात औषधांचा तुटवडा यामुळे परिसरातील गोरगरीब जनता त्रस्त झाली आहे. डॉक्टरांकडून औषधे लिहून दिली जातात; मात्र औषध देणारे कर्मचारी गोळ्या बाहेरून घ्या, असे सांगतात. येथे जखमेवरील औषधे, टीबी, बीपीवरील गोळ्याही उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे डॉक्टरांनी दहा गोळ्या लिहून दिल्या, तर कर्मचारी फक्त चारच देतात. अनेकदा औषध असूनही नसल्याचे कर्मचारी सांगतात. सध्या औषध उपलब्ध नसल्याने बाहेरून औषधे विकत घ्या, असे स्त्री रुग्णालय नेकनुर येथील कर्मचारी रुग्णांना सांगत आहेत. रुग्णालयाचा भोंगळ कारभारामुळे मात्र रुग्णांचा जीव टांगणीला लागला आहे. नर्सची




पत्रकाराला सुद्धा अरेरावीची भाषा, रविवारी सकाळी 11 वाजता पत्रकार अभिजीत पवार नामक त्या ठिकाणी रुग्णालयामध्ये गेले असता त्यांना सुद्धा तुम्ही सकाळी लवकर यायचे ना दहाच्या अगोदर आमच्या मागे आता खूप काम आहे. आता होणार नाही नंतर या अशा प्रकारचे नर्स ने पत्रकाराशी सुद्धा म्हटले आहे. नंतर डॉक्टरला फोन करून पत्रकाराने विचारले असता मी पत्रकार आहे असे म्हटल्यावर लगेच नर्सने दखल घेतली. जर पत्रकारांना अशा गोष्टींना सामोरे जावे लागते तर सामान्यांचे काय यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. उन्हाळा वाढत असल्याने वातावरणात बदल झाले आहेत. त्यामुळे विविध आजारांनी डोके वर काढले आहे. शासकीय रुग्णालयात रुग्णांच्या रांगा लागत आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणात गोरगरिबांचा समावेश आहे. परंतु या शासकीय आरोग्य केंद्रात औषधांचा तुटवडा असल्याने रुग्णांमध्ये नाराजी आहे. मोफत उपचार मिळावे म्हणून गोरगरीब जनता प्राथमिक आरोग्य केंद्रात येतात; मात्र औषधे नसल्याने हजारो रुपयांचे औषध घेण्याचे प्रसंग गोरगरीब जनतेवर येत आहे. रविवार दिवशी गर्दी असल्यामुळे तेथील येणाऱ्या प्रत्येक रुग्णांना बाहेरूनच औषधे घ्यावी लागत होती. नेकनूर मध्ये मोठी बाजारपेठ असल्यामुळे त्या ठिकाणी पंचक्रोशीतील नव्हे तर जिल्ह्यातील व्यापारी वर्ग शेतकरी वर्ग त्या ठिकाणी आपली जनावरे विकण्यासाठी येत असतात. या दिवशी रुग्णालयामध्ये गर्दी निर्माण होते. डॉक्टरांकडून औषधे लिहून दिली जातात; मात्र औषध देणारे कर्मचारी गोळ्या बाहेरून घ्या, असे सांगतात. येथे जखमेवरील औषधे, टीबी, बीपीवरील गोळ्याही उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे डॉक्टरांनी दहा गोळ्या लिहून दिल्या, तर कर्मचारी फक्त चारच देतात. अनेकदा औषध असूनही नसल्याचे कर्मचारी सांगतात.

# राष्ट्रीय समाज पार्टी आयोजित दिल्ली या ठिकाणी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती उत्सव सोहळ्यास मोठ्या प्रमाणात उपस्थित रहावे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर

**बीड प्रतिनिधी**

राष्ट्रीय समाज पार्टी आयोजित राजमाता पुण्यश्लोक आयोजित होळकर जयंती उत्सव 31.मे रोजी दिल्ली या ठिकाणी राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती होणार आहे, या कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे, राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक महादेवजी जानकर, हे उपस्थित राहणार आहेत, , या जयंती सोहळ्यास मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे असे आव्हान जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांनी केले, \पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती आली आहे. संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणात उत्साहात साजरी करण्यात येत असते. तळागळात, मोठ्या प्रमाणात जयंती साजरी झाली पाहिजे.राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांनी सर्व समाजाला आव्हान केल आहे. .शासनाच्या वतीने अनेक जयंतीच्या शासकीय सुट्ट्या दिल्या



गेल्या आहेत. या सुट्टीच्या औचित्य साधून समाजातील अनेक घटकांनी जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. महापुरुषांच्या त्यांनी केलेल्या त्यागाचा व त्यांच्या विचारांच्या आत्मसमान करतात .दिनांक 31 मे रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात शासकीय सुट्टी जाहीर करण्यात यावी. देशभरातील सर्व शासकीय कार्यालयात गाव , वाडी वस्ती तांड्यावर राजमाता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करून त्यांच्या विचाराचा वसा सर्वसामान्य माणसापर्यंत गेला पाहिजे अस आव्हान राष्ट्रीय समाज पक्षाचे दबंग जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांनी केल आहे.

## मुलानी वाडगाव पाणीपुरवठा विभाग बनला मद्यपानाचा अड्डा;अधिकारी कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष

**पैठण/प्रतिनिधि**




पैठण तालुक्यातील मुलानी वाडगाव येथील पाणीपुरवठा विभाग सध्या मद्यपानाचा अड्डा झाला आहे.अधिकारी कर्मचारी यांचे देखील याकडे दुर्लक्ष होत आहे.सध्या उन्हाचा पारा खूप असल्याकारणाने काही वयोवृद्ध निसर्गरम्य वातावरणात सावलीचा सहारा घेण्यासाठी पाणीपुरवठा विभागात जातात व तिथे त्यांना सावलीचा सहारा तर दूरच पण मद्यपान जुगारासाठी असलेल्या इसमांचा त्रास सहन करावा लागतो आहे.

सध्या पाणीपुरवठा विभागामध्ये तीन-चार कर्मचारी असून एकही उपस्थित राहत नाही व तेथे आलेल्या मद्यपान जुगारू एकमेकांत वाद करतात .वादविवादात एकमेकांवर दगडफेक करतात .याकडे कुठल्याही कर्मचारी किंवा अधिकारी यांचे कुणाचेच लक्ष नाही .तसेच आजूबाजूच्या रहदारीलाही खूप त्रास सहन करावा लागत आहे . तसेच गावातील पाण्याच्या पाईपलाईन बऱ्याचशा ठिकाणी लिकेज असल्या कारणाने हजारो लिटर पाणी वाया जात आहे. याकडे देखील कोणाचे लक्ष नाही. वरिष्ठाने याकडे बारकाईने लक्ष द्यावे अशी गावकऱ्यांची मागणी आहे.

## धारूर येथे विविध सामाजिक उपक्रम राबवून राजमाता पु.अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी होणार

**प्रतिनिधि/किल्लेधारुर**

धारूर शहरात राजमाता पु. अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात व विविध सामाजीक उपक्रम राबवून साजरी करण्याचे ठरवण्यात आले.

राजमाता पु.अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समिती किल्ले धारूर कसबा विभाग व पेठ विभाग तर्फे आज कसबा विभाग येथे बैठक आयोजित करण्यात आली होती सर्व समाज बांधवांच्या सहमतीने यशवंत गायके यांची अध्यक्ष पदी निवड करण्यात आली इतर कार्यकारणीत उपध्यक्ष-धनंजय मैंद,रमेश शेळके सचीव- संतोष लगस्कर, यमाजी शिंपले कोषाध्यक्ष-प्रवीण गायके, अशोक भुजंग गायके.मिरवणूक आयोजक -गोवर्धन गायके



गंगाधर गायके सुभाष गायके गंगाधर शेळके पांडुरंग गायके, सत्यभान गायके सदाशिव गायके अशोक गायके यांची निवड करण्यात आली. यावेळी आगळ्या वेगळया पध्दतीने सामाजिक उपक्रम राबवण्यावर प्राधान्य देण्याचे ठरवण्यात आले .सामाजिक उपक्रमाबरोबर सांस्कृतिक कार्यक्रम व नवीन उपक्रम घेऊन जयंती साजरी करण्याचे ठरवण्यात आले. यावेळी युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्व.सुनील लोमटे हे जनसामान्यांचा आधार होते - न्या.वसंतराव पाटील सामान्यांचा नवाब सुनिलकाका या पुस्तकाचे प्रकाशन

**प्रतिनिधि/अंबाजोगाई**

स्व.लोकनेते सुनिल लोमटे यांनी आपल्या कार्यातून स्वतःचे नेतृत्व सिद्ध केले.सामान्य माणसाच्या वेदना ओळखून त्यांना संवेदशीलतेने मदतीचा हात दिला. त्यांना सामाजिक न्याय व पाठबळ दिले. ही जाणीव आजही समाजमनात कायम आहे. असे प्रतिपादन सेवानिवृत्त न्यायधिश वसंतराव पाटील यांनी केले. येथील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात लोकनेते सुनिलकाका लोमटे सामाजिक प्रतिष्ठान, अंबाजोगाई यांच्या वतीने "सामान्यांचा नवाब सुनिलकाका" या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून न्या.पाटील बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते दाजीसाहेब लोमटे होते. तर व्यासपीठावर माजी आमदार संजय दौंड, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळुक, विठ्ठल सहकारी कारखान्याचे संचालक अभिजित पाटील, प्रसिद्ध कवियत्री विमल माळी, प्रा. सतीश पत्की, अँड. सयद शेख, गिरीधारीलाल भराडिया, बबन लोमटे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना न्या. पाटील म्हणाले की, स्व. सुनिल लोमटे यांनी आपल्या कार्यातून सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती समोर आपल्या पुस्तकातून नवा आदर्श ठेवला आहे. एका व्यक्तीच्या निधनानंतर ही लोक त्यांच्या कार्याला विसरत नाहीत. त्यांचे कार्य या पुस्तकातून प्रेरणा देत राहील. असे सांगून स्व. सुनिल लोमटे यांच्या अनेक आठवणींना त्यांनी उजाळा दिला. यावेळी संजय दौंड,सतीश पत्की,विमल माळी,अँड.सयद, सचिन मुळुक,अभिजित पाटील यांनी आपल्या सुनिल लोमटे यांच्या सोबतच्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी आपल्या प्रास्ताविकात श्रीमती ऍड.शोभा लोमटे यांनी या पुस्तकाद्वारे आठवणींना उजाळा दिला असल्याचे सांगितले.



सुनिलकाका यांच्या निधनानंतर जनसामान्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या.त्याच या पुस्तकात शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले.

या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते "सामान्यांचा नवाब सुनिलकाका" या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

या कार्यक्रमाचे संचलन प्रकाश बोरगावकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार ऋषिकेश लोमटे यांनी मानले. या कार्यक्रमास महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लोकनेते सुनिलकाका लोमटे सामाजिक प्रतिष्ठान, अंबाजोगाई च्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# साक्षाळपिंप्री कनिष्ठ महाविद्यालयातून गायत्री जगताप बारावीच्या परीक्षेत प्रथम

**प्रतिनिधि/बीड**

बीड तालुक्यातील साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शेकडा निकाल ९८ टक्के एवढा लागला असून कु.जगताप गायत्री प्रदीप हि विद्यार्थिनी विज्ञान शाखेतून प्रथम आली आहे. साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून विज्ञान शाखेतून प्रथम कु.जगताप गायत्री प्रदीप 92.83 द्वितीय पव्हणे भागवत राजेंद्र 92.17 ,तृतीय जोगदंड समृद्धी मोहन 91 टक्के असे 405 पैकी 402 विद्यार्थी उत्तीर्ण होऊन 99.25 टक्के निकाल लागला तर कलाशाखेतून प्रथम कुमारी पांचाळ पल्लवी विश्वांभर85.33% ,द्वितीय खाकरे राधिका महादेव ८३.१७% ,तृतीय घंटलवाड ओमकार देवराव ८२.८३ ,गोरे मोनिका दादासाहेब ८२.८३ ,७९ पैकी ७५विद्यार्थी उत्तीर्ण होऊन 94.93% निकाल लागला. वाणिज्य शाखेतून प्रथम घोलप साहस सुनील 91.17%, द्वितीय गवते प्रसाद मधुकर 78%, तृतीय गवते अभिषेक हनुमान ७७. ५० असे २७ पैकी 26 विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९६.२९ टक्के निकाल लागला .एकूण शेकडा निकाल 98 टक्के एवढा लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर ,युवा नेते रोहित क्षीरसागर ,संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, कार्यवाह एम. ए.राऊत ,साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत पवळ, पर्यवेक्षक जनार्दन काळे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## यशवंतराव पाटील कॉलेजचा बारावीचा निकाल ९८.२३

**कुडूत्री/प्रतिनिधि**

सोळांकूर ता.राधानगरी येथील यशवंतराव पाटील ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल 98.23टक्के लागला असून कला विज्ञान एकूण परिक्षेस प्रविष्ट 167 पैकी164 विद्यार्थी उत्तीर्ण झालेत शाखानिहाय गुणाणूक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढीलप्रमाणे विज्ञान शाखा प्रथम नेहा निवास पाटील-80.67,द्वितीय प्रणव राजाराम कुंभार-78.83, तृतीय सुरज मारुती पाटील-78.33 कला शाखा प्रथम सुस्मिता





संजय पाटील-72.83,द्वितीय तनुजा आनंदा सुतार-65.17,तृतीय स्वाती साताप्पा कदम-64.00 असे आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांना व्यंकनाथ शिक्षण मंडळाचे संस्थापक/सचिव ए वाय पाटील, अध्यक्ष आर वाय पाटील प्राचार्य एच जे ननवरे यांचे प्रोत्साहन व विभागप्रमुख प्रा. बी एस बरगे, प्रा.एम एम पाटील, प्रा.व्ही डी चौगले, प्रा.ए जे पाटील, प्रा एस एल चौगले, प्रा आर डी पानारी,प्रा सुजाता पाटील, प्रा दिपाली भोळे,आईवडील शिक्षकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.

# पाटोदा तालुक्यात पाण्याची भीषण टंचाई ३३ टँकर द्वारा पाणी पुरवठा मात्र शिवाजीनगर व माऊलीनगर भागात पाण्यासाठी भटकंती

**प्रतिनिधि/पाटोदा**

पाटोदा तालुक्यातील लोकांना सध्या भीषण पाणीटंचाई ला सामोरे जावं लागत आहे तालुक्यातील 33 गावांना तेहतीस टँकरने ७३ खेपां करण पाणीपुरवठा केला जातो मात्र पाटोदा शहरातील शिवाजीनगर व माऊली नगर हा गेल्या वीस दिवसापासून पाण्यासाठी भटकंती करतोय हे विशेष या ठिकाणचा पाणीपुरवठा बीएसएनएलच्या चुकीमुळे बंद पडलेला आहे टँकर द्वारा पाणीपुरवठा करुन सर्वसामान्य नागरिकांची तहान भागवली मात्र शेतकऱ्याच्या पशुधनाचा पाण्याचा प्रश्न गंभीर असून सध्या पशुधन घेऊन विशेषता शेळ्या मेंढ्या वाले मोठ्या कठीण प्रसंगातून आपल्या पशुधनांना पाणी उपलब्ध करून देत आहे या गंभीर समस्येकडे गावातील नेतेगिरी व पुढारपण करणाऱ्या मंडळींनी लक्ष घालून शेतकऱ्यांच्या समस्या प्रशासनाकडून सोडवून घ्याव्यात अशी आम जनतेची मागणी होत आहे यंदा पाऊस अल्प प्रमाणात झाला, मार्चमध्येच टँकरचे प्रस्ताव शासनदरबारी आले. तालुक्यात प्रथम २३ मार्च रोजी चार गावात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु करण्यात आला होता. आजघडीला पाटोदा तालुक्यातील ३३ गावांना 33 टँकरने ७३ खेपांच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात आहे. मंझरीघाट, दासखेड, सोनेगाव, सौदांना, वैद्यकीन्ही, कुसळंब, भायाळा,पाचंग्री, बेनसूर, गांधनवाडी, पांढरवाडी, कोतन,जाधववाडी, चिंचोलीनाथ, अंतापूर निवडूंगा, अंमळनेर, वाधीरा, तळेपिंपळगाव, उखडा, खडकवाडी, बेदरवाडी, सावरगाव घाट, मगगाव, पिंपळगाव धस, तांबाराजुरी, पारगाव घुमरा, जवळाला, गवळवाडी, वेरला, नायगाव, रोहतवाडी, पाचेगाव या गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु आहे सध्या टँकर द्वारा पाणीपुरवठा केला जातो



तो अपुरा असा आहे कारण टँकरच्या खेपा देताना शेतकऱ्याच्या पशुधनाचा विचार करून खेपा वाढविण्याची मागणी शेतकरी करीत आहे यासाठी गाव पातळीवर राजकारणात सक्रिय असलेल्या गाव नेते मंडळी व पुढाऱ्यांनी प्रशासनासमोर टँकरच्या खेपा वाढविण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी जनतेतून होत आहे सध्या शेतकरी आपली पशुधनाच्या पाण्यासाठी भटकंती करत आहेत याहीपेक्षा वाईट परिस्थिती शेळ्या मेंढ्या ची होत आहे त्यांना पाणी पाजण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे पाटोदा शहरातील शिवाजीनगर व माऊली नगर भागातील पाण्याचा प्रश्न बीएसएफ गुत्तेदाराच्या हलगर्जीपणा मुळे घडलेला असून तब्बल 21 दिवस झाले तरी अजून या भागातील लोकांना पाणी नाही गुत्तेदारावर या संदर्भात कारवाई करणे आवश्यक होते मात्र अद्याप पावतो गुत्तेदारावर कसलेही प्रकारची कारवाई न केल्यामुळे शिवाजीनगर व माऊली नगर भागातील जनता प्रशासनाच्या व नगरपंचायत च्या भूमिकेबद्दल संशय व्यक्त करत आहे पावसाळा सुरू होण्यासाठी एक महिन्याचा कालावधी बाकी असुन एक महिन्यात योग्य पाऊस पडला तर पाणी परिस्थिती सुधारेल अन्यथा भविष्यात मोठ्या कठीण परिस्थितीतून शेतकऱ्यासह नागरिकांना सामोरे जावे लागणार आहे हे मात्र निश्चित

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
सोमवार २७ मे २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4




# शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक घेतले जाणार का? शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचा मोठा खुलासा

**मुंबई /प्रतिनिधि**

महाराष्ट्राच्या राजकारणात मनुस्मृतीवरुन वारंवार वादाची ठिणगी पडते. यावेळी तर मनुस्मृती शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा थेट आरोपच विरोधकांकडून केला जातोय. राज्य सरकारने इयत्ता तिसरी ते बारावीच्या शालेय अभ्यासक्रमात भगवद्गीता आणि मनाचे श्लोक समाविष्ट करण्याच्या हालचाली सुरु केल्या आहेत. एससीईआरटीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांनुसार राज्याचा शालेय अभ्यासक्रम तयार केला आहे. त्यावर आक्षेप आणि सूचनाही



मागवल्या आहेत. यावरुन नव्या वादाला तोंड फुटलंय. पारंपरिक आणि प्राचीन ज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना करुन देण्याच्या नावाखाली मनुस्मृती अभ्यासक्रमात आणत असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. या आरोपांवरुन वादळ उठल्यानंतर आता मंत्री दीपक केसरकर यांनी स्पष्टीकरण दिलं आहे.

शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृतीतील श्लोकांचा समावेश करण्यास रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी तीव्र विरोध केला आहे. याबाबत रामदास आठवले यांनी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून मनुस्मृतीचे श्लोक अभ्यासक्रमात घेण्याबाबत तीव्र विरोध दर्शविला. यावेळी दोघांमध्ये झालेल्या चर्चेत दीपक केसरकर यांनी शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक येणार नसल्याचे ठोस आश्वासन रामदास आठवले यांना दिले आहेत. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक घेण्याच्या विषयाला पूर्णविराम मिळालेला आहे.

### रामदास आठवले यांचा आक्षेप काय?

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन केले आहे. जातीभेद विषमता आणि माणुसकीला काळीमा फासणाऱ्या भेदभावाच्या अनेक बाबी मनुस्मृतिमध्ये असल्यामुळे मानवतेच्या हक्कासाठी; विषमता आणि जातीभेदाच्या अमानुष रूढी परंपरे विरुद्ध संगर म्हणून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे मनुस्मृतीचे दहन करून सामाजिक क्रांती केली. त्यामुळे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जाळलेल्या मनुस्मृतीचे श्लोक अभ्यासक्रमात घेण्यास आंबेडकरी जनतेचा तीव्र विरोध असल्याचे रामदास आठवलेंनी शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना दूरध्वनीद्वारे सांगितले. त्यावर दीपक केसरकर यांनी मनुस्मृतीचे श्लोक अभ्यासक्रमात घेणार नसल्याचे आश्वासन रामदास आठवले यांना दिले.



मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांना शिरापूर धुमाळ येथील ग्रामस्थ हरिनाम सप्ताहाला उपस्थित राहण्यासाठी निमंत्रण देताना

# संधी मिळाल्यास सोयगाव च्या मूलभूत विकासासाठी संसदेत आवाज उठवेल-डॉ.कल्याण काळे

**प्रतिनिधि/सोयगाव**

मला निकालाची चिंता नाही,त्यासाठी मला मतदारांनी दिलेल्या आशीर्वादाचे आभार मानण्यासाठी आलो आहे चार जूनच्या खासदार जनतेने ठरविला आहे त्यामुळे मला चिंता नाही असे प्रतिपादन महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ कल्ल्यांन काळे यांनी रविवारी सोयगावात भेटी दरम्यान केले आहे रविवारी डॉ कल्याण काळे हे सोयगाव, परिसरातील गावात आभार दौऱ्यावर आले यावेळी सोयगावात झालेल्या छोटेखानी सभेत ते बोलत होते



व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठनेते रंगनाथ काळे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख राजू राठोड, विठ्ठल बदर, दत्ता पांढरे, आदिंची उपस्थिती होती यावेळी जेष्ठनेते रंगनाथ काळे,जिल्हा प्रमुख राजू राठोड, आदींनी आभार दौऱ्यात मतदारांचे आभार मानले यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजू काळे,शिवसेना तालुका प्रमुख दिलीप मचे,राष्ट्रवादी शहराध्यक्ष रवींद्र काळे, काँग्रेसचे शहराध्यक्ष दिनेश हजारी,राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष डॉ इंद्रजित सोळुंखे,आदींची उपस्थिती होती...

चौकट---निकाल काहीही घोषित झाला तरीही चिंता नाही असे उमेदवार डॉ कल्याण काळे म्हणत असले तरी मात्र समर्थकांनी मतांच्या बेरजेवरून उमेदवार कल्याण काळे यांच्या विजयाचा दावा सोयगावात केला आहे तर दुसरीकडे मात्र महा युतीचे उमेदवार रावसाहेब दानवे हेच खासदार होणार असा भाजपा च्या कार्यकर्ते सोशल मीडियावर पोस्ट व्हायरल करत आहे त्यामुळे निकालाच्या आधीच सोयगावात विजयाचे राजकारण तापले आहे......

# माढा तालुक्याती कव्हे गावातील जनाबाई अर्जुन ढेरे यांचा १०१ वा वाढदिवस धुमधडाक्यात साजरा.

**सोलापूर प्रतिनिधि**

आत्तापर्यंत आपण अनेक अनोख्या वाढदिवसाच्या सेलिब्रेशन बघितलं असेल. त्यात अनेक मोठ मोठ्या ठिकाणी जाऊन अनेक जण आपला वाढदिवस करतात परंतु एक अनोखा वाढदिवस माढा तालुक्यातील कव्हे येथील १०१ वर्षाच्या आजींचा वाढदिवस दिनांक २५/०५/२०२४ रोजी १०१ पणत्या लावून जल्लोषात साजरा करण्यात आला. वय वर्ष १०१ वयाची शंभरी ओलांडली तरी या आजीबाई ठणठणीत आहेत. तरुणाईच्या भाषेत बोलायचं झालं तर एकदम फिट काठी धरुन किंवा कुणाचा तरी आधार घेऊन का होईना, त्या अजूनही चालतात. त्यांचा १०१ वा वाढदिवस ख-या अर्थानं अविस्मरणीय ठरला. आजींना चार मुली एक मुलगा आणि १६ नातवंडं, आणि खापर पणतू २७ असं त्यांचं कुटुंब आहे.... आजींचा वाढदिवस




अविस्मरणीय करण्यासाठी त्यांच्या सूनबाई मा. सरपंच सुरेखा सुग्रीव ढेरे व मुलगा सुग्रीव अर्जुन ढेरे तसेच सर्व नातेवाईक यांनी आजीचा वाढदिवस साजरा करण्याचं ठरवलं. आजी तशा तंदुरुस्त आहेत. आजींना सर्व नातेवाईकांनी तसेच ग्रामस्थांनी त्यांच्यासाठी अनोख्या भेटवस्तूही दिल्या त्यांच्या दर्शनासाठी व शुभेच्छा देण्यासाठी गर्दी जमली होती. आजींच्या वाढदिवसानिमित्त ह.भ.प. विठ्ठल महाराज पाटील ( लोहारा )यांचे कीर्तन ठेवण्यात आले होते. यामध्ये १०१ ज्ञानेश्वरी ग्रंथ व १०१ विठ्ठल रुक्मिणी मूर्ती भक्तांना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे नातेवाईकांसाठी तसेच ग्रामस्थांसाठी भोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

आजींना अजून निरोगी दीर्घायुष्य लाभो हिच त्यांच्या वाढदिवसानिमित्त सदिच्छा..

# दाऊदपूर येथेल काचगुंडे यांच्यावर अट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल.. अद्याप आरोपी मोकाट,परळी ग्रामीण ठाण्या च्या पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष

बीडचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या परळी विधानसभा मतदारसंघातील दाऊतपूर या गावात मागासवर्गीय लोकांवरती अन्याय व अत्याचाराची घटना घडली आहे, मागासवर्गीय कुटुंबातील युवकाला, जातिवाच शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. त्यामध्ये भादवी 324, 504 ,505, 34,अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यांतर्गत 3(1)( r), 3(2)(पाच) तसेच 3(2)(vs) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दाऊतपुर येथील गावगुंड ज्यांच्यावर या अगोदर 302 सारखे गुन्हे व ब्लास्टींग करण्यासारखे गुन्हे नोंद आहेत. अशा लोकांनी जाणीवपूर्वक हा हल्ला व जिवे मारण्याची धमकी दिली आहे. यांना तात्काळ अटक करून योग्य कार्यक्रम अशी मागणी करण्यात आली आहे. गुन्हा नोंद झालेले आरोपी मारुती उत्तम काचगुंडे, ज्ञानदेव बाबुराव काचगुंडे, खंडू उत्तम काचगुंडे, वैजनाथ बाबुराव काचगुंडे व त्यांचे सहकारी यांनी जातिवाचक शिवा गाडी करून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी गुन्हा नोंद झाला असून अद्याप हे आरोपी मोकाट फिरत असल्याची माहिती समोर येत आहे, ग्रामीण पोलिसांकडून आरोपीला अभय दिले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.या प्रकरणी आकाश आश्रुबा मुंडे यांच्या कुटुंबियांना न्याय मिळावा अशी मागणी करण्यात येत आहे. यांच्या जीवितास धोका आहे व यांना जिवे मारण्याची धमकी दिल्या जात आहेत. अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा नोंद करण्यासाठी आकाश मुंडे यांना जवळपास पंधरा दिवसाचा कालावधी लागला, यामध्ये राजकीय दबाव असल्याची माहिती समोर येत आहे. दाऊतपुर येथे या गावगुंडांचा प्रचंड त्रास असून हे प्रकरण या अगोदर तीन वेळेस घडले आल्याची चर्चा आहे. तरी या प्रकरणात पोलीस प्रशासनाने ठोस भूमिका घेऊन योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी दाऊतपुर येथील मागासवर्गीय मुंडे कुटुंबीय करत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com